विषय : स्थूल अर्थशास्त्र(सेमिस्टर – IV)
एस.वाय.बी.ए (S-2)

प्रकरण पहिले
प्रास्ताविक

स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ :

संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समुच्चयात्मक पातळीवर केला जाणारा अभ्यास म्हणजे समग्रलक्षी अर्थशास्त्र होय. स्थूल अर्थशास्त्र एकूणचा बेरजेचा सरासरीचा संपूर्णचा आणि समुच्चयाचा केला जाणारा अभ्यास म्हणजे स्थूल अर्थशास्त्र होय .जसे राष्ट्रीय उत्पन्न, एकूण मागणी, एकूण पुरवठा ,एकूण बचत ,एकूण गुंतवणूक इत्यादी.

स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या

1. **जे एल हँसन** : एकूण रोजगार ,एकूण बचत, एकूण भांडवल गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न यासारख्या मोठ्या समुच्चयांचा आणि या समुच्चयातील परस्परसंबंधाचा अभ्यास करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे स्थूल अर्थशास्त्र (समग्र अर्थशास्त्र) होय.
2. **प्रा.ॲलन** : स्थूल आर्थिक समुच्चयातील परस्परसंबंधाचा अभ्यास करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे स्थूल अर्थशास्त्र (समग्रलक्षी) होय.

स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये :

1. स्थूल अर्थशास्त्रात एकूणाचा, बेरजेचा ,सरासरीचा व समूच्ययाचा अभ्यास केला जातो.
2. स्थूल अर्थशास्त्रात अभ्यासाचे परिमाण एक व्यक्ती किंवा एक घटक नसून संपूर्ण अर्थव्यवस्था असते.
3. स्थूल अर्थशास्त्रात सर्व घटक मिळून तयार होणाऱ्या अर्थव्यवस्थेचा समुच्चयात्मक पातळीवर अभ्यास केला जातो.
4. स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा उत्पन्न हा केंद्रबिंदू आहे.
5. स्थूल अर्थशास्त्रात गतिमान घटकांच्या अभ्यासाला विशेष महत्त्व असते.
6. स्थूल अर्थशास्त्रात प्रत्येक घटकाचा स्वतंत्र अभ्यास न करता एका घटकातील बदलाचा दुसऱ्या घटकावर होणारा परिणाम अभ्यासला जातो.

प्रश्न : स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.(Nature of Macro Economics)

उत्तर : 1) समुच्चयात्मक दृष्टिकोन : स्थूल अर्थशास्त्रात एका घटकाऐवजी किंवा विशिष्ट घटका ऐवजी संपूर्ण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी व पुरवठा यांच्या समतोलाचा अभ्यास केला जातो. स्थूल अर्थशास्त्रात एकूण मागणी व एकूण पुरवठ्याचा अभ्यास करताना वस्तू व सेवांची बेरीज विचारात घेतली जाते. ही बेरीज करताना वैयक्तिक घटकांकडे दुर्लक्ष केले जाते.

2) पैशात अभिव्यक्ती : स्थूल अर्थशास्त्रात जर वस्तू एकजिनसी नसतील तर बेरीज करताना अडचणी येतात किंवा ती बेरीज अर्थहीन होते.म्हणून प्रत्येक वस्तूचे किंमत पैशात व्यक्त केली जाते.मागणी बाजूला उपभोक्त्यांचा वस्तूवर होणारा खर्च विचारात घेतला जातो तर पुरवठा बाजूला विक्रेत्यांना विक्रीपासून मिळणारे उत्पन्न विचारात घेऊन अर्थव्यवस्थेचा समतोल विचारात घेतला जातो.वस्तू व सेवांच्या किमती पैशात व्यक्त केल्या जातात.

3) मागणी- पुरवठ्यात सुप्त संबंध :

सूक्ष्मलक्षी विवेचन पद्धतीत मागणी व पुरवठा या दोन घटकांचा स्वतंत्रपणे विचार केला जातो. मागणी व पुरवठ्यातील परस्पर संबंध दुर्लक्षिले जातात. स्थूल अर्थशास्त्रात मात्र मागणी व पुरवठा या दोन घटकांचा एकत्रित विचार केला जातो.मागणीतील बदलाचा पुरवठ्यावर आणि पुरवठ्यातील बदलाचा मागणीवर होणारा परिणाम विचारात घेतला जातो.

4) उत्पन्न हा दुवा : सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात एका वस्तूच्या मागणीचा आणि पुरवठ्याचा समतोल किमतीद्वारे स्पष्ट केला जातो तर स्थूल अर्थशास्त्रात एकूण मागणी व एकूण पुरवठा यांच्यातील समतोल उत्पन्नाद्वारे स्पष्ट केले जातात. समजा देशाच्या पातळीवर लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास लोकांच्या एकूण खर्चात वाढ होते त्यामुळे एकूण मागणीच्या पातळीत वाढ होते. एकूण मागणीत वाढ झाल्याने वस्तू व सेवांच्या किमतीत वाढ होऊन वस्तू व सेवांच्या एकूण पुरवठ्यात वाढ होते.व अशा पद्धतीने एकूण उत्पन्न पातळीतील बदलाद्वारे एकूण मागणी व एकूण पुरवठ्यात संतुलन प्रस्थापित होते.

5) एकूण मागणी : स्थूल अर्थशास्त्रात एका विशिष्ट वस्तूची मागणी विचारात न घेता एकूण मागणी विचारात घेतली जाते. **एकूण मागणी म्हणजे देशातील उपभोक्त्यांची मागणी, व्यवसाय संस्थांची मागणी, सरकारची मागणी व परदेशातील उपभोक्त्यांची देशातील वस्तूला असणारी मागणीची एकत्रित बेरीज असते**. उदा. उपभोक्ते अन्नधान्य, दूध, भाजीपाला, कापड व इतर दैनंदिन वस्तूंची मागणी करतात.उद्योगसंस्था कच्चामाल, यंत्रसामग्री, वाहतुकीचे साधने, वीज, इंधन इत्यादी वस्तूंची मागणी करतात सरकार प्रशासकीय कार्यासाठी फर्निचर,कॉम्प्युटर्स, स्टेशनरी,वाहतुकीची साधने,औषधे सिमेंट,लोखंड, पोलाद इ. वस्तूंची मागणी करते तर परदेशातील ग्राहक देशातील उद्योग संस्थांकडून विविध प्रकारच्या वस्तू खरेदी करतात उदा.चहा, कॉफी,मसाल्याचे पदार्थ तयार कपडे यंत्रे इ

6) एकूण पुरवठा : स्थूल अर्थशास्त्रात एक किंवा विशिष्ट वस्तूचा पुरवठा विचारात घेतला जात नाही. देशात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू व सेवा +(अधिक) देशातील उपभोक्त्यांद्वारे परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांचा एकत्रित विचार केला जातो. एकूण पुरवठ्याचा विचार करताना परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांपेक्षा देशांतर्गत एकूण वस्तू व सेवांच्या उत्पादनात अथवा पुरवठ्यात वाढ झाल्यास देशातील रोजगार पातळीत व उत्पन्न पातळीत वाढ होते.

7) समतोलाच्या अटी : स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या समतोलाचा(संतुलनाचा) अभ्यास केला जातो. जसे की एकूण मागणी =एकूण पुरवठा, एकूण उत्पन्न= एकूण खर्च,एकूण उत्पादन =एकूण उपभोग, निर्यात वस्तूचे मूल्य= आयात वस्तूचे मूल्य, पैशाची एकूण मागणी =पैशाचा एकूण पुरवठा.

वरील सर्व अटींची पूर्तता झाल्यास संपूर्ण अर्थव्यवस्थेचे संतुलन प्रस्थापित होते स्थूल अर्थशास्त्रात होणारे संतुलन हे कायमस्वरूपी नसून परिस्थितीतील बदलानुसार बदलणारे असते

प्रश्न: स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.(स्थूल अर्थशास्त्रात कोणकोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो?) किंवा (स्थूल अर्थशास्त्राचे अभ्यास विषय कोणते आहेत?.) (Scope of Macro Economics)

उत्तर: स्थूल अर्थशास्त्राच्या व्याप्तीत स्थूल अर्थशास्त्रात अभ्यासल्या जाणाऱ्या अभ्यास विषयांचा समावेश होतो स्थूल अर्थशास्त्रात गतिमान घटकांचा अभ्यास केला जातो स्थूल अर्थशास्त्राच्या व्याप्तीच्या दोन महत्त्वाच्या बाजू आहेत 1) समग्रलक्षी आर्थिक सिद्धांत 2) समग्रलक्षी आर्थिक धोरण.

समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती पुढील प्रमाणे आहे.

1.उत्पन्न व रोजगार विषयक सिद्धांत : उत्पन्न व रोजगार हा स्थूल अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय आहे. साधनसामग्रीचा महत्तम आणि कार्यक्षम वापर आणि साधनसामग्रीच्या कार्यक्षम वाटणीचे विश्लेषण उत्पन्न व रोजगार विषयक सिद्धांताच्या सहाय्याने केले जाते. उत्पन्न व रोजगार विषयक सिद्धांतात उत्पादन पातळी व रोजगार निश्चितीचे सिद्धांत अभ्यासले जातात.उत्पन्न व रोजगार पातळीत बदल झाल्यास अर्थव्यवस्थेत मूलभूत बदल होतात. उत्पन्न व रोजगाराची पातळी एकूण मागणीवर अवलंबून असते. एकूण मागणी ही उपभोग्य वस्तूंची मागणी व भांडवली वस्तूंची मागणी यांची बेरीज असते.स्थूल अर्थशास्त्रात उत्पन्न व रोजगार विषयक सिद्धांतात परिणामकारक मागणीचे तत्व उपभोग फलन गुंतवणूक फलन बचत फलन गुणक तत्व प्रवेक तत्व व्यापार चक्राचे सिद्धांत अभ्यासले जातात

2.सर्वसामान्य किंमत पातळीचे सिद्धांत :

स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यास विषयात किंमत पातळी हा दुसरा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे**. सर्वसामान्य किंमत पातळी म्हणजे देशात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांची सरासरी किंमत पातळी होय.** किंमतपातळीचे मापन पैशाच्या साह्याने केले जाते. सर्वसामान्य किंमतपातळीच्या विवेचनात पैसा,पैशाची कार्य, मूल्य निर्धारणाचा सिद्धांत, अवास्तव चलनवाढ,अवास्तव चलनसंकोच,मंदीयुक्त चलनवाढ, यांची कारणे व परिणाम आणि पैशाची मागणी,पैशाचा पुरवठा इत्यादी घटकांचा अभ्यास केला जातो.

3.**आर्थिक विकासाचे सिद्धांत:**

आर्थिक विकास म्हणजे देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा जास्तीत जास्त कार्यक्षम आणि काटकसरीने वापर करून अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेत वाढ करणे होय. आर्थिक विकासाच्या सिद्धांतात आर्थिक वृद्धीचे सिद्धांत ,आर्थिक वृद्धीची समस्या, आर्थिक व्यवहारातील चढ-उतार ,आर्थिक वृद्धी आणि आर्थिक स्थैर्याची समस्या ,उत्पादन क्षमतेचा प्रश्न, उत्पादन क्षमतेचा वापर यांची चर्चा केली जाते .हरी□ड आणि डोमर,सोलो,मिल, क□डोर आणि जॉन रॉबिन्सन यांचे आर्थिक वृद्धीचे सिद्धांत अभ्यासले जातात.

4.आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक सिद्धांत :

आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विश्लेषणात व्यवहारतोल,व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे, व्यवहारतोल दुरुस्त करण्याचे उपाय,यांचा अभ्यास केला जातो. तसेच विनिमयदर निश्चिती,विनिमयदर निश्चितीचे सिद्धांत,परकीय चलनविषयक समस्या व आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक सिद्धांताचा,व्यापार अटींचा, खुला व्यापार धोरण, संरक्षित व्यापारधोरण,भांडवलाची हालचाल,प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास केला जातो.

5.विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत :

विभाजनाच्या समग्रलक्षी आर्थिक सिद्धांताच्या सहाय्याने संपूर्ण देशाच्या पातळीवर होणाऱ्या उत्पादनाच्या आणि उत्पन्नाच्या निरनिराळ्या घटकात होणाऱ्या विभागणीचा अभ्यास केला जातो. या सिद्धांतात मजुरी व नफा यांचे सापेक्ष हिस्से कसे निर्धारित होतात याचे विवेचन केले जाते .राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीत होणाऱ्या बदलाचा अभ्यास विभाजनाच्या समग्रलक्षी आर्थिक सिद्धांतात केला जातो.

6.आर्थिक धोरण:

देशाच्या दीर्घकालीन आर्थिक विकास विषयक धोरणाला समग्रलक्षी आर्थिक धोरण असे म्हटले जाते.समग्रलक्षी पातळीवर होणारी बेकारी, दारिद्र्य,आर्थिक विषमता,किंमत अस्थिरता व्यवहारतोल विषयक प्रश्न,आर्थिक अस्थैर्य इत्यादी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी समग्रलक्षी आर्थिक धोरणांचा वापर केला जातो.चलनविषयक

धोरण, राजकोषीय धोरण उत्पन्न व किंमत विषयक धोरण, वेतन विषयक धोरण,विदेशी व्यापार विषयक धोरण यांचा अभ्यास केला जातो.

प्रश्न : स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा. (Importance of Macro Economics)

उत्तर : 1930 च्या जागतिक महामंदीच्या काळात निर्माण झालेल्या बेकारी, आर्थिक अस्थैर्य या आर्थिक समस्या सोडवण्यास सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र अपयशी ठरले. जे एम केन्स यांनी समग्रलक्षी आर्थिक विश्लेषणाचा वापर करून अर्थशास्त्रीय विवेचनात क्रांती घडवून आणली संपूर्ण जगात समग्रलक्षी अर्थशास्त्रीय विवेचन पद्धतीचे महत्त्व वाढत गेले .समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्व पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1) सामूहिक वर्तनाचा अभ्यास : सूक्ष्मलक्षी विवेचन पद्धतीमध्ये विशिष्टाचा किंवा व्यक्तीचा वैयक्तिक पातळीवर अभ्यास केला जातो व त्या अभ्यासाच्या आधारे वैयक्तिक पातळीवर काही निष्कर्ष मांडले जातात.परंतु जेव्हा व्यक्ती समूहात किंवा समाजात येते तेव्हा तिचे वर्तन वैयक्तिक वर्तनापेक्षा वेगळे असते याचाच अर्थ वैयक्तिक वर्तन व सामूहिक वर्तनात फरक आहे. **वैयक्तिक वर्तनापेक्षा सामूहिक वर्तन कसे वेगळे आहे याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासास महत्त्व आहे.**

2) संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीचे यथार्थ ज्ञान : स्थूल अर्थशास्त्र संपूर्णचा, समाजाचा किंवा राष्ट्राचा अभ्यास करते उदा. एकूण रोजगार, एकूण बचत,एकूण भांडवल गुंतवणूक,राष्ट्रीय उत्पन्न,सर्वसामान्य किंमत पातळी इत्यादी. राष्ट्रीय पातळीवरील सर्व घटकांचा अभ्यास केल्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेचे कार्य कसे चालते याचे आकलन स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे होते

3) सरकारला आर्थिक धोरण ठरवण्यासाठी उपयुक्त : समग्रलक्षी अर्थशास्त्रात देशाच्या पातळीवर निर्माण होणाऱ्या समस्या अभ्यासल्या जातात. उदा- बेकारी, चलनवाढ, चलन संकोच आर्थिक मागासलेपणा,बचत व गुंतवणुकीची कमतरता, ई .या सर्व समस्या सोडवण्यासाठी तसेच सरकारला चलनविषयक धोरण,राजकोषीय धोरण,व्यापारविषयक धोरण ठरवण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ मंदीच्या काळात विस्तारात्मक राजकोषीय व चलन विषयक धोरण वापरणे योग्य असते तर तेजीच्या काळात कडक चलनविषयक धोरण व संकोचात्मक राजकोषीय धोरणाचा वापर करावा लागतो. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी चलन व राजकोषीय धोरणाद्वारे बचत व गुंतवणुकीत वाढ आणि तंत्रज्ञान विषयक सुधारणांना चालना देणारे धोरण राबवावे लागते.

4) व्यावसायिक निर्णय घेण्याच्या दृष्टीने महत्त्व :

स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे व्यवस्थापकांना व्यावसायिक निर्णय घेताना निर्णय प्रक्रियेतील समस्या समजून घेण्यासाठी व त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी मदत होते.

5) आर्थिक वृद्धीला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्व : स्थूल अर्थशास्त्र हे आर्थिक वृद्धीचे निर्धारण करणारे घटक,उत्पादकता कमी असण्याची कारणे याविषयीचे स्पष्टीकरण करते. आर्थिक प्रगतीमुळे लोकांच्या राहणीमानात सुधारणा होते.आर्थिक वृद्धीच्या उच्च दरामुळे दारिद्र्य आणि बेकारीची समस्या सोडवण्यास मदत होते. समग्रलक्षी आर्थिक सिद्धांतावरून अर्थव्यवस्थेच्या आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत एकूण परिणामकारक मागणीतील कमतरता हा मुख्य अडथळा आहे हे स्पष्ट होते.समग्रलक्षी आर्थिक विवेचनामुळे स्वयंपोषीत आर्थिक वृद्धी कशी साध्य करता येईल याचे ज्ञान प्राप्त होते.

6) व्यापार चक्राच्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी : पैशाच्या पुरवठ्यातील बदल,उत्पादनातील चढ-उतार यामुळे भाववाढ किंवा भावघट होऊन व्यापार चक्र निर्माण होते.व्यापार चक्राचे वेगवेगळ्या घटकांवर परिणाम होतात. व्यापार चक्र नियंत्रित करण्यासाठी कोणत्या चलनविषयक आणि राजकोषीय उपाययोजना कराव्यात याचे स्पष्टीकरण समग्रलक्षी अर्थशास्त्र देते.

7) वैयक्तिक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त:

संपूर्ण अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती समजल्याशिवाय वैयक्तिक निर्णय योग्य पद्धतीने घेता येत नाही. सरकारी धोरणाचा वैयक्तिक पातळीवर लाभ कसा प्राप्त होईल हे समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासाद्वारे समजते.अर्थव्यवस्थेच्या सद्यस्थितीवरून लोकांना कोणत्या प्रकारची मालमत्ता विकत घ्यावी उदाहरणार्थ घर, गाडी,सोने, शेअर्स , इतरांना कर्ज द्यावे किंवा नाही हे निर्णय घेण्यास मदत होते.

8) सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासास उपयुक्त : सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र आणि समग्रलक्षी अर्थशास्त्र विवेचन पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्या परस्परांना पूरक आहे. उदाहरणार्थ सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात एका उद्योग संस्थेचा अभ्यास करून निष्कर्ष मांडले जातात एका उद्योग संस्थेच्या अभ्यासाबाबत निष्कर्ष मांडताना सुरुवातीला अनेक उद्योगसंस्थांचा अभ्यास केला पाहिजे तरच एका उद्योग संस्थेचे निष्कर्ष अचूक व योग्य ठरतील.एका उपभोक्त्याच्या वर्तणुकीचा अभ्यास करताना लाखो उपभोक्त्यांचे वर्तणूक अभ्यासावे लागते.सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचे नियम किंवा सिद्धांत स्पष्ट करताना समग्रलक्षी विवेचन पद्धतीचे निष्कर्ष उपयोगी ठरतात.

9) मूलभूत आर्थिक प्रश्नांच्या अभ्यासासाठी उपयुक्त : देशाच्या पातळीवर निर्माण होणारे दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता, आर्थिक अस्थैर्य, आर्थिक विकासाच्या प्रश्नांचा अभ्यास व त्यांचे सोडवणूक करण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासास महत्त्व असते.

प्रश्न: स्थूल अर्थशास्त्राच्या मर्यादा स्पष्ट करा (Limitations of Macro Economics)

उत्तर: समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या विवेचन पद्धतीचा विकास होत असताना समग्रलक्षी विवेचन पद्धतीत काही दोष किंवा उणीवा निर्माण झाल्या त्या दोषांना किंवा उणीवांना समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा असे म्हणतात त्यातील काही प्रमुख मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत

1.वैयक्तिक घटकांकडे दुर्लक्ष : समग्रलक्षी विवेचन पद्धतीत एकूणाचा किंवा समुच्चयाचा अभ्यास केला जातो .हा अभ्यास करताना वैयक्तिक वागणूक व व्यक्तिगत पातळीवरील घटक विचारात घेतले जात नाहीत .परंतु समूह किंवा समुच्यय ही वैयक्तिक घटकांची बेरीज असते. वैयक्तिक घटकांकडे दुर्लक्ष करून समुच्चयाचा अभ्यास केल्यास समग्रलक्षी विवेचन पद्धतीत परिपूर्णता येत नाही.उदाहरणार्थ वैयक्तिक उत्पन्न विचारात न घेता राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे.

2.बेरजेचा प्रश्न : समग्रलक्षी अर्थशास्त्रात एकुणाचा अभ्यास करताना बेरीज केली जाते किंवा सरासरी काढली जाते.जर दोन वस्तू एकजिनसी असतील किंवा एकाच गटातील असतील तर त्या बेरजेला अर्थ प्राप्त होतो. जर वस्तू एकजिनसी नसतील आणि बेरीज केल्यास ती बेरीज निरर्थक ठरते.

3. फसवी परिमाणे : समग्रलक्षी अर्थशास्त्रात काही चलांचा घटकांचा अभ्यास करताना दिशाभूल किंवा फसगत होण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ शेतमालाच्या किमती 10% वाढल्या व औद्योगिक मालाच्या किमती 10 टक्क्याने कमी झाल्यास किंमत पातळी स्थिर आहे असे म्हणणे चुकीचे होईल. उलट शेतमालाच्या किमती कमी करण्यासाठी व औद्योगिक मालाच्या किमती वाढवण्यासाठी वेगवेगळया उपाययोजना कराव्या लागतील.

4.योग्य माहितीचा अभाव : समग्रलक्षी अर्थशास्त्रात जे काही नियम किंवा सिद्धांत मांडले जातात ते उपलब्ध आकडेवारीवरून मांडले जातात. जर आकडेवारी खोटी फसवी किंवा दिशाभूल करणारी असल्यास किंवा आकडेवारी गोळा करण्यात पारदर्शकता नसल्यास त्या आकडेवारीच्या किंवा माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष अचूक राहणार नाही.

5.विभिन्न परिणाम : समग्रलक्षी अर्थशास्त्रात एका चलातील घटकातील होणाऱ्या बदलाचा समाजातील सर्व घटकांवर सारखा परिणाम होत नाही.उदाहरणार्थ तेजीच्या काळात किंमत पातळीत वाढ झाल्यास उत्पादक, व्यापारी,विक्रेते,साठेबाज,सट्टेबाज यांना फायदा होतो म्हणजे या वर्गावर अनुकूल परिणाम होतो; मात्र दुसरीकडे सर्वसामान्य ग्राहक,स्थिर उत्पन्न गटातील लोक यांच्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

6.मापनाचा प्रश्न : समग्रलक्षी विवेचन पद्धतीत पैशाच्या आधारे किंवा मोबदल्याच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते. मात्र असे मापन करताना एकाच व्यक्तीने दोन समान कृती केल्यास एका कृतीचा समावेश

राष्ट्रीय उत्पन्नात होतो तर दुसऱ्या कृतीचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होत नाही.त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अडचणी येतात.उदाहरणार्थ शिक्षकाने स्वतःच्या मुलास शिकवल्यास मोबदला मिळणार नाही परंतु शिक्षकाने इतर मुलांची शिकवणी घेतल्यास शिक्षकाला मोबदला मिळेल व या मोबदल्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होईल.

7.विरोधाभास : स्थूल अर्थशास्त्रात मुळातच अनेक रचनात्मक दोष निर्माण झाले आहेत. एका खाजगी व्यक्तीचे बचत त्या व्यक्तीसाठी एक फायद्याचे असते परंतु संपूर्ण समाजाने बचत केली तर ती हानिकारक ठरू शकते. या प्रकारचे अनेक विरोधाभास समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये आहेत.

प्रश्न: काही प्रमुख स्थूल अर्थशास्त्रीय घटक स्पष्ट करा (Some Major Macro Economic Issues)

उत्तर : 1) रोजगार आणि बेरोजगार(Employment and Unemployment) : अर्थव्यवस्थेतील रोजगार पातळी आणि राष्ट्रीय उत्पन्न पातळी कशी निश्चित होते तसेच अनैच्छिक बेकारी कसे निर्माण होते?या प्रमुख घटकांशी स्थूल अर्थशास्त्र संबंधित आहे.आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी बेरोजगारीचे(बेकारीचे) अनेक विश्लेषण दिले आहेत. केन्सच्या मते एकूण उपभोग आणि एकूण गुंतवणूक यामध्ये घट झाल्यामुळे बेकारी निर्माण होते.

2) उत्पन्ननिश्चिती (Income Determination) : अल्पकाळात उत्पादन तंत्रात बदल होत नसताना रोजगार पातळी आणि एकूण उत्पादन किंवा उत्पन्न पातळी या दोघांमध्ये वाढ होणे शक्य असते. आर्थिक क्रियांमधील बदलांमुळे राष्ट्रीय उत्पन्नावर रोजगार पातळीत वाढ किंवा घट होऊ शकते. अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादन घटकांचा वापर करून जी उत्पादन पातळी काढली जाते तिला पूर्ण रोजगार उत्पादन पातळी असे म्हणतात.

3) चलनवाढ /भाववाढ (Inflation): सर्वसाधारण किंमत पातळीत होणारी सातत्यपूर्ण वाढ म्हणजे चलनवाढ किंवा भाववाढ होय. फिशर या अर्थशास्त्रज्ञाच्या मते जर मध्यवर्ती बँकेने देशातील पैशाच्या पुरवठ्यात वाढ केली तर त्याच प्रमाणात देशात भाववाढ होते.याउलट जेव्हा मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्यात कपात करते तेव्हा त्याच प्रमाणात किंमतपातळीत घट होते. परंतु केन्सने असे दाखवून दिले आहे की अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीला पोहोचल्यानंतरच भाववाढ घडून येते. फिलिप्स या अर्थशास्त्रज्ञाने मात्र इंग्लंडमधील सांख्यिकीय माहितीच्या आधारे असे दाखवून दिले आहे की देशात बेकारी आणि भाववाढ एकाच वेळी दिसून येऊ शकतात भाववाढ आणि बेकारीच्या एकत्र अस्तित्वालाच मंदियुक्त भाववाढ असे म्हणतात.

4) व्यापारचक्र (Business Cycle) : एकूण उत्पादन रोजगार आणि किंमत पातळी यांच्यासह व्यावसायिक आणि आर्थिक क्रियांमध्ये ठराविक कालावधीनंतर होणारे चढ-उतार म्हणजे व्यापारचक्र होय. तेजी,घसरण,पुनर्जीवन, मंदी या चार अवस्था आहेत. तेजीमध्ये (विस्तार अवस्था) किमती, उत्पन्न ,रोजगार आणि उत्पादन यामध्ये वाढ होत असते; तर मंदी (संकोच अवस्थेत) त्यांच्यामध्ये घट होत असते.

व्यापारचक्राच्या नियंत्रणासाठी राजकोषीय साधने व चलनविषयक साधने सरकारकडून वापरली जातात.

4) आर्थिक वृद्धी (Economic Growth)

आर्थिक वृद्धी हे दीर्घकालीन संकल्पना आहे .राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नातील सातत्यपूर्ण वाढीशी ती निगडित आहे. समाजाच्या उत्पादन करण्याच्या क्षमतेमध्ये जेव्हा वाढ होते तेव्हा आर्थिक वृद्धी घडून येते. जर तंत्रज्ञानामध्ये वाढ झाली तर पूर्वीच्याच साधनांच्या साह्याने पूर्वीपेक्षा अधिक उत्पादन करणे शक्य होते; म्हणून तंत्रज्ञानातील प्रगती हा आर्थिक वृद्धीचा एक स्रोत आहे असे मानले जाते. परंतु उत्पादन वाढीबरोबरच मागणीत देखील वाढ झाली तर आर्थिक वृद्धी होऊन येते.

5) व्यवहारतोल आणि विनिमयदर (Balance of Payment and Exchange Rate) : एका देशातील नागरिकांचे जगातील नागरिकांबरोबरच्या एका विशिष्ट काळातील म्हणजे एका वर्षातील सर्व प्रकारच्या वित्तीय व्यवहारांचे एकत्रितपणे मांडलेले व्यवहार, ताळेबंदपत्रक व त्याचे व्यवस्थितपणे ठेवलेले रेकॉर्ड म्हणजे व्यवहारतोल होय. विविध बाबींमधून देशाला इतर देशांकडून असलेले येणे आणि इतर देशांना द्यावे लागणारे देणे याची सविस्तर माहिती व आकडेवारी मिळते. व्यवहारतोलाचे चालू खाते आणि भांडवली खाते अशी दोन खाती असतात. व्यवहारतोलाची येणे बाजू परकीय चलनाचा देशामधील पुरवठा दर्शवते तर देणे बाजू परकीय चलनाची मागणी दर्शवते. परकीय चलनाची मागणी व पुरवठा आपल्या चलनाचा परकीय चलनाशी असलेल्या दर म्हणजे विनिमय दर ठरवतो. **विनिमय दर म्हणजे आपल्या चलनाची परकीय चलनात सांगितलेली किंमत होय.** परकीय चलनबाजारात परकीय चलनाची मागणी आणि पुरवठा यावरून ती ठरत असते. विनिमय दर कसा बदलतो त्यानुसार आयात व निर्यात निर्यात बदलते व आयात व निर्यात कशी बदलते त्यानुसार परकीय चलनाची मागणी आणि पुरवठा बदलत असतो. कारण निर्यातीमधून परकीय चलनाचा पुरवठा तर आयातीमधून परकीय चलनाची मागणी ठरत असते.

थोडक्यात व्यवहारतोलाचा देशातील एकूण आर्थिक व्यवहारपातळीवर परिणाम होत असतो त्यामुळे स्थूल अर्थशास्त्रामध्ये व्यवहारतोलाचा अभ्यास केला जात असतो.

प्रश्न: सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्रातील फरक स्पष्ट करा.

अ.नं	सूक्ष्म अर्थशास्त्र	स्थूल अर्थशास्त्र
अर्थ	अर्थ : सूक्ष्म अर्थशास्त्र हे एक विशिष्ट संस्था, विशिष्ट कुटुंबे, विशिष्ट उद्योग, व्यक्तिगत किमती यांचा अभ्यास करते.	स्थूल अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील एकूण समूहांचा व सरासरीचा अभ्यास करते . अर्थशास्त्राच्या या अभ्यास शाखेमध्ये समूहाची व्याख्या केली जाते व नंतर त्यामधील संबंध तपासून बघितले जातात
व्यक्तिनिष्ठ आणि समाजनिष्ठ	सूक्ष्म अर्थशास्त्र हे व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचे आहे.	स्थूल अर्थशास्त्र हे समग्रनिष्ठ स्वरूपाचे आहे. कारण ते संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करते.
अभ्यास विषय	सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट एककाचा अभ्यास केला जातो. उदा-विशिष्ट उद्योगसंस्था किंवा विशिष्ट उद्योग,विशिष्ट कुटुंब.	स्थूल अर्थशास्त्रात समूहाचा अभ्यास केला जातो.उदा- एकूण उत्पन्न, एकूण रोजगार, सर्वसामान्य किंमत पातळी इ.
उपयुक्तता	सूक्ष्म अर्थशास्त्राचे उपयुक्तता मर्यादित आहे .	स्थूल अर्थशास्त्राची उपयुक्तता अधिक व्यापक स्वरूपाचे आहे.
सीमांत विश्लेषण	सूक्ष्म अर्थशास्त्र सीमांत विश्लेषणावर आधारित आहे .	स्थूल अर्थशास्त्रामध्ये सीमांत विश्लेषणाला कोणतेही स्थान नाही.
अर्थव्यवस्थेचा अभ्यास	सूक्ष्म अर्थशास्त्राच्या साह्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेचे एकूण स्वरूप लक्षात येत नाही.	स्थूल अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या सहाय्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजते.
वापर	सूक्ष्म अर्थशास्त्राचा उपयोग देशाचे आर्थिक धोरणे ठरवण्यासाठी किंवा देशाचे महत्त्वाचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी होत नाही.	स्थूल अर्थशास्त्राचा उपयोग देशाच्या आर्थिक धोरणे ठरवण्यासाठी होतो. तसेच देशातील विविध आर्थिक समस्या सोडवण्यासाठी ही त्याचा उपयोग होतो.
प्राचीन-अर्वाचीन	सूक्ष्म अर्थशास्त्राचा उपयोग प्राचीन काळापासून केला जात आहे परंतु अलीकडे त्याचे महत्त्व कमी होत आहे.	जागतिक महामंदीनंतर स्थूल अर्थशास्त्राचा खऱ्या अर्थाने उगम झालेला आहे आणि वापर होऊ लागला आहे. या अर्थशास्त्राची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच गेली आहे.
स्थितीशील आणि गतिशील	सूक्ष्म अर्थशास्त्र हे अनेक गृहीतांवर आधारित आहे त्यामुळे हे स्थितिशील मानले जाते.	स्थूल अर्थशास्त्र फारशा गृहीतांवर आधारित नसते म्हणजेच ते बदलणाऱ्या स्थितीचा अभ्यास करते म्हणून त्याला गतिशील अर्थशास्त्र असे म्हटले जाते.

व्यावहारिक उपयुक्तता	सूक्ष्म अर्थशास्त्राचे निष्कर्ष आणि नियम प्रत्यक्ष व्यवहारात फारशे उपयुक्त नसतात. सूक्ष्म अर्थशास्त्र अव्यावहारिक आहे.	स्थूल अर्थशास्त्रातील निष्कर्ष आणि नियम प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये वापरण्याजोगे असतात. स्थूल अर्थशास्त्र व्यवहारीक आहे.
संकुचित व व्यापक	सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र हे समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या तुलनेत संकोचित आहे.	स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या तुलनेत व्यापक आहे.
व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ	सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ आहे.	स्थूल अर्थशास्त्र समाजनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ आहे.
अभ्यासाचा केंद्रबिंदू	सूक्ष्म अर्थशास्त्रात किंमत यंत्रणा हा अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. किंमत बदलल्यास मागणी व पुरवठ्याच्या समतोलात बदल होतो.	स्थूल अर्थशास्त्रात उत्पन्न हा अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. उत्पन्नातील बदलाच्या साह्याने मागणी व पुरवठ्यातील समतोल स्पष्ट केले जातो.
व्याप्ती	सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याप्तीत वस्तूचे किंमतनिश्चिती उत्पादन घटकांची किंमतनिश्चिती आणि आर्थिक कल्याण या अभ्यास विषयांचा समावेश होतो.	स्थूल अर्थशास्त्राच्या व्याप्तीत उत्पन्न व रोजगार, सर्वसामान्य किंमत पातळी,आर्थिक विकासाचे सिद्धांत,आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत, विभाजनाचे समग्रलक्षी सिद्धांत,आर्थिक धोरण या अभ्यास विषयांचा समावेश होतो.